<u>नि. फौ. ख. क्र.८०/२०१६</u> निशाणी ६१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.११ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव — गजानन लक्ष्मण ढोणे

वय — ६२ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस हवालदार

पत्ता — रा. रामदास पेठ, अकोला, ता. जि. अकोला

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०२३ या कालावधीमध्ये पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. दि.१३.०२.२०१६ रोजी मी पो.स्टे. येथे कार्यरत असताना माझ्याकडे अप. क्र. १९/२०१६, भादंवि कलम ३२४ व ५०६ अन्वये नोंद झालेला गुन्हा तपासकामी देण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासकामी माझ्याकडे FIR मुळ प्रत, फिर्यादीचा जबानी रिपोर्ट तसेच MLC रिपोर्ट इ. कागदपत्र प्राप्त झाले. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, सदरची फिर्याद प्रकाश शेगोकार यांनी श्रीकृष्ण शेगोकार याच्या विरुध्द लोखंडी घणाने मारहाण करुन त्यांना जखम केल्याबाबत दाखल केली होती.

२. मी दि.१४.०२.२०१६ रोजी दोन पंचांसमक्ष घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळ हे मला फिर्यादी याने दाखविले. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६२** देण्यात येत आहे. त्यानंतर मी शासकीय वैद्यकीय अधिकारी, अकोला येथे फिर्यादी याचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याबाबत माझ्या सहीचे पत्र दिले. त्याअनुषंगाने फिर्यादी याचा वैद्यकीय अहवाल व क्युरी रिपोर्ट संबंधित वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून मी प्राप्त केला. आता मला नि.क्र.५९ कडील संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी माझ्या नावाने दिलेले पत्र दाखविण्यात आले, त्यावर माझी सही आहे.

३. त्यानंतर दि.१५.०२.२०१६ रोजी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपी यास पंचांसमक्ष अटक केली. आता मला सदर अटक फॉर्म दाखविण्यात आला त्यावर माझी,

आरोपी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६३** देण्यात येत आहे.

**मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदाराचा सरतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे**.

दिनांक : २२.०१.२०२६.
ठिकाणः बाळापूर

**( डी. एम. वाघमारे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

**मध्यान्हानंतर सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत पुढील सरतपास शपथेवर सुरुः**

४. आरोपी याने गुन्ह्यात वापरलेला लोखंडी हातोडा हा दोन पंचांसमक्ष काढून दिला तो गुन्ह्याकामी पंचनाम्याद्वारे जप्त केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६४** देण्यात येत आहे. सदर जप्त मुद्देमाल संबंधित मालखाना येथे जमा केला. त्यानंतर संबंधित साक्षीदार यांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात त्याच्या विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांचे मार्फत उलटतपासः**

५. माझा बक्कल क्र.७११ आहे. हे म्हणणे खरे आहे की, FIR च्या कॉलम क्र.१३ मध्ये गुन्ह्याचा तपास कोणाकडे वर्ग केला जातो त्या अधिकाऱ्याचे नाव व बक्कल क्रमांक नमुद केले जाते. आता मला नि.क्र.२० कडील छापील FIR दाखविण्यात आली त्यामधील कॉलम क्र.१३ मध्ये मजकूर नमुद केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आलेला नसताना देखील मी सदर गुन्ह्याचा तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता तसेच गुन्ह्यात वापरलेल्या हत्याराबाबतचे मत प्राप्त करण्याकरीता वेगवेगळे पत्र द्यावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दोषारोप पत्रासोबत फिर्यादीचे जखमांचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता मी

दिलेले पत्र जोडलेले नाही. आता मला न्यायालयातील अभिलेख दाखविण्यात आला, त्यामध्ये नि.क्र.५८ कडील पत्र हे दिल्याचे साक्षीदार यांनी दाखविले. नि.क्र.५८ कडील पत्र हे गुन्ह्यातील वापरलेल्या मुद्देमालाचा क्युरी/मत मागविण्याकरीता दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र हे मी फिर्यादी सोबत संगनमत करुन प्राप्त करुन घेतले.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्ह्यातील घटनास्थळ पंचनामा पो.स्टे. येथे तयार केला व त्यावर ओळखीच्या पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील तथाकथित मुद्देमाल हा मला फिर्यादी याने आणून दिला व तो मी दोन ओळखीच्या पंचांसमक्ष जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्ह्यामध्ये फिर्यादी यांच्या नातेवाईकांव्यतिरीक्त स्वतंत्र साक्षीदार यांचे जबाब नोंद केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द कोणताही पुरावा नसताना चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २२.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.22 17:42:46 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २२/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २२/०१/२०२६ |